
# झिमझिम धारा

**मदन हजेरी**

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा
दा. क्र. : ३५२५



BVBK-0403528

वाचनालय
बा. वा.
३५२५
२६।४।९९

# झिमझिम धारा

3525 26।4।99
बा० वा

मदन हजेरी

BVBK-0403528

प्रकाशक
योगेश प्रकाशन पुणे ३७.

ISBN 81-87013-00-1

प्रकाशक : **योगेश अनंत बुरटे**
योगेश प्रकाशन,
बी. १६ / ८ इंदिरानगर (लोअर),
पुणे ३७.

सर्व हक्क : © लेखकाधीन

**मदन हजेरी**
मु. पो. ता. राजापूर
जि. रत्नागिरी

प्रथमावृत्ती : **१ जुलै १९९७**

मुद्रक : **स्मिता प्रिंटर्स**
नागनाथ पाराजवळ, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

टाईपसेटींग : **काशिनाथ वि. शिगवण**
अक्षरवेल
सी/१८, प्लॉट नं. ५७२, दत्तवाडी,
पुणे ४११०३०.

मुखपृष्ठ व आतील चित्रे : **श्री. अरविंद ताकवले**
पुणे

**किंमत : १५ /- रुपये**

“ पहिल्या पावसात भिजणाऱ्या
सर्व मुलांना...”

- मदन हजेरी

पूर्वप्रसिद्धी :

किशोर ❑ आनंद ❑ सकाळ ❑ टॉनिक ❑ साकेत सवंगडी

## अनुक्रमाणिका


१. झिमझिम धारा

२. ताई

३. मोर

४. कोकिळ

५. खंड्या

६. उन्ह

७. सांग आई

८. येणार का बोला ?

९. दोस्ती

१०. चिवारवाडी

११. सशाचे चित्र

१२. एकदा काय झाले !

१३. काठ

१४. फुलपाखरे

१५. घाट

१६. भारतभूमी

१७. आमची दुपार

१८. बबडीची खेळणी

१९. कोण ?

२०. होडी


२१. झरा

२२. असे वाटते

२३. राणी

3525

## १. झिमझिम धारा



झिमझिम झिमझिम
झिमझिम आल्या धारा.
धारामध्ये घुसळला
सारा सोसाट्याचा वारा.

धारा गेल्या भिंतीवर
भिंतीच्या खिडकीवर
खिडकीला तावदान
करत होते पहारा.

धारा गेल्या अंगणात
रांगोळीच्या रिंगणात
रिंगणातल्या रेषांनी
हळूच केला पोबारा.

धारा गेल्या नदीवर
नदीमधल्या होडीवर
पसरला तरयाने
लाल लाल पिसारा.

धारा गेल्या माडातून
दाट दाट झाडातून
झाडातल्या पक्षिणीचा
भिजून गेला निवारा.

## २. ताई



दारापुढे शेणसडा
शिंपडते माझी ताई.
बाजुलाच मोगरीत
फूल फुलारून येई.

दाट, दाट झाला सडा
नक्षी बोटांची उठली.
तिच्या नाजुक बोटाने
रंग रांगोळी रंगली.

सावरत परकर
ऊठ-बस घाई घाई
दिवे अंगणी लावता
वाटे उजळे पुण्याई.

तिच्या मैत्रिणी देखण्या
गोळा भोवताली होती
नक्षी फुलांची पाहून
डावा डोळा मिचकती.

असे अंगण भरले
जशा आभाळी चांदण्या
सारे घर प्रकाशले
गोड झाल्या दूधकण्या.




## ३. मोर

ढग जांभळे आल्याड
पुढे झाड उंबराचे
तुरे लावुनिया डोई
मोर फांदीवर नाचे.

त्याची शेपटी आखूड
ओझे पेलते पिसांचे
सात रंगांचे गारुड
डोळा थुई थुई नाचे.

बोलणारे डोळे गोड
कान तिखट तयाचे
धरू जाता त्याला थोडे
वेगावती पंख त्याचे.



त्याला कळपाचे वेड
वेड हिरव्या झाडांचे
कधी पर्णहीन झाड
कधी एकटे राहण्याचे.



झुडूपात किर्र दाट
लपलेले घर त्याचे
कोंब ओले मातीआड
भक्ष्य बनती तयाचे.

नभ काळोखता दाट
डोळे ओलावती त्याचे
फुले वैभवी पिसारा
फिटे पारणे डोळ्याचे.

## ४. कोकिळ

झाडातून माडातून
नागझर करी घाई.
कुऊ कुऊसा आवाज
जळातून पुढे वाही.

दाट दाट वडातून
हले फांदी वरखाली
शाल काळी लपेटून
कोकिळ पानातून जाई.

लालसर डोळे त्याचे
जणू फळे वडा यावी
लांब शेपूट देखणे
खालीवर सदा होई.

फळे रसाळ खाऊन
चोच पिवळी हिरवी
घराशिवाय राहून
करितो हा साऱ्या सोयी.

गाता सकाळी कोकिळ
धुके विरुनिया जाई
कुऊ कुऊच्या नादानं
रान मोहरून येई.




## ५. खंड्या



डोहाकाठी अंधारात
उभे बन बाभूळाचे
सारा पिऊन एकांत
ध्यान चालले खंड्याचे.



निळे हिरवे जाकीट
त्याने ओढले पंखांचे
रंग गंजाचा पोटाला
जणू अस्तरच त्याचे.



लांब निमुळती चोच
तिला डोहाळे माशांचे
नदी ओढ्यातून हाच
फांदी-फांदीवर नाचे.

गाणे गातो उडताना
चिईऽ चिईऽ आवाजाचे
जलासमान जाताना
लक्ष भक्ष्यावर त्याचे.

लांब आडवा बोगदा
घर निवाऱ्याचे त्याचे
किनाऱ्याला बांधतो हा
सारे बंगले स्वप्नांचे.

## ६. उन्ह



उन्हं उतरली
उन्हं उतरली
डोंगर माथ्याला
उन्हं उतरली.

हिरवी हिरवी
श्रावण साखळी
बांधून झाडेही
नाचाया लागली.

सांडुनिया दूर
मोत्यांचे दागिणे
वळत वळत
वाटही चालली.

उन्हं उतरूनी
झऱ्यापाशी आली
खळाळाला गुज
सांगत बसली

उबारला डोह
उतरल्या गायी
भिजले खडक
चिंब फुलवेली.

## ७. सांग आई

सांग आई
अंगणात
दुडू दुडू
ऊन धावणार कधी ?



सांग आई
अंगणात
सावल्या
रांगणार कधी ?

सांग आई
अंगणात
शिवाशिवी
खेळणार कधी ?



सांग आई
दूध भात
चांदण्यात
भरवणार कधी ?

सांग आई
गालावर
केसातून
हात फिरवणार कधी ?

## ८. येणार का बोला ?




घरापासून थोडे दूर
येणार का बोला,
तुम्ही येणार का बोला ?

जाऊ वनामध्ये दाट
पाहू वेलींचाही थाट
पान गळला पांगारा
पाहू लालेलाल झाला.

जाऊ शेतात हिरव्या
होऊ धावणारा वारा
पानातून फुलातून
शोधू गंध नवा चला.

जाऊ केळीच्या बनात
पाहू लांब रुंद पाने
गाणे कोकिळ गाताना
शोधू कुठेसा लपला.

जाऊ कुरणात थेट
खेळू रंगातून सात
गोफ रंगांचा विणून
घरी परतुया चला.




# ९. दोस्ती



या भिंतींच्या
पल्याड आहे
खूप, खूप काही
तेथे नेउनी
सांगा आम्हा
थोडे काही काही.

कातळ काळे
टाकून मागे
झरा पुढे वाही
हिरवी झाडे
हात गुंफती
दिशातून दाही.







रंगबिरंगी
फुलपाखरे
पंखांची घाई
या फुलातून
त्या फुलावर
भिरभिरती पायी.



निळ्या आभाळी
सूर्य एकटा
डोलत डोलत जाई
आमची त्याची
सांगा दोस्ती
होणार की नाही ?

क्र. 3425 28/4/99
विषय

## १०. चिवारवाडी




घरावर घर
त्यामागे डोंगर
डोंगरात झाडी
झाडी घनदाट.

नदी काठाला
छोटुकली होडी
झाडीत नांदते
चिवारवाडी.

चिवार वाडीत
चिव्याचं बन
हिरव्या पानात
वाऱ्याचं गाणं.
काजवे रातीत
करती खोडी.

धबधबे
धबधबा
खळाळे पाणी
पाखरे गातात
मंजुळ गाणी
गाण्यात झोपते
चिवारवाडी.



## ११. सशाचे चित्र

रोज तळ्याच्या काठाला
ससा येतो बसायला.



कागद करून आकाशाचा
निळा रंग ओततो त्यावर
आणि लागतो हसायला.

गुलाबी कमळे मधोमध
बाजुला काढून हिरवी पाने
ब्रश लागतो पुसायला.



चार पाखरे चिमुकली
काढून निळ्या आकाशात
गवतात लागतो नाचायला.

## १२. एकदा काय झाले !




एकदा काय झाले
मिनीने आभाळाला
खाली बोलावले.

उतरले निळे नभ
चांदोबाची लाख मुले
अंगणात मोगरीला
आली चांदण्यांची फुले.

उतरले निळे नभ
दव थेंब आले ओले
पोपटी तृणावर
हिरे हळूच सांडले.

उतरले निळे नभ
अंगणही तळे झाले
तळ्यातून मळ्यातून
पाय मिनीचे नाचले.

## १३. काठ



विहिरीचा काठ
गोलच गोल
दुपारी दिसतो
पाण्यात खोल.



नदीचा काठ
लांबच लांब
उलटा दिसतो
पाण्यात घाट.



खाडीचा काठ
तिरकस थोडा
दुपारी पाहतो
शिडाचा घोडा.



झऱ्याचा काठ
वाकडा तिकडा
दुपारी त्यात
खेळतो खेकडा.

## १४. फुलपाखरे



माझ्या ग अंगणात
थवे फुलपाखरांचे
गोल गोल रिंगणात
गाणे फिरते रंगाचे.

माझ्या ग अंगणात
पंख थिरके तयाचे
लाल गुलाबी फुलांत
ध्यान चालले निळ्यांचे.




माझ्या ग अंगणात
वेल निळे गोकर्णीचे
गर्द पोपटी पानांत
झुले झुंबर पंखांचे.



माझ्या ग अंगणात
मिटे पंख पाखरांचे
हळू जाता धरू हात
पंख फाटती तयांचे.

अशा माझ्या अंगणात
रंग सांडले फुलांचे
फुलपंखी मंडपात
रंग थवे पाखरांचे.




१५. घाट

घाटामधून जाताना
टिकलीएवढे दिसते गाव
हिरव्या हिरव्या पानावरती
लाल कौलारु तरंगते नाव.

घाटामधून जाताना
ऊनसावल्यांचा लपंडाव
पिवळ्या गवती उताराला
पंचांशिवाय चालतो डाव.


घाटामधून जाताना
माकडे मांडून बसती डाव
या फांदीतून त्या फांदीवर
सारखी त्यांची धावाधाव.

## १६. भारतभूमी




प्राणाहून प्रिय आम्हाला, भारतभूमी आमुची
नाना चाली, नाना बोली, परी भाषा एक मनाची.

झाडे छोटी, झाडे मोठी
दरी डोंगरी, उभी एकटी
तळी तयांच्या खळाळणारी
गोड मधुर गाणी झऱ्याची
गुंगत नाचत काठावरती, पाने वेलींची.






रानपाखरे नवलाईची
नभात निळ्या भिरभिरती
इवल्या त्यांच्या घरट्यांची
ऊब मावेना पंखातुनी
नाना पक्षी, नाना वृक्षी, सावली त्यांना मायेची



लाल पांढरी काळी माती
अशी आमची इथली नाती
या नात्यांना पंख विषारी
फुटणार कधी हो नाही
हिचा लावुनी टिळा, गर्जू ही माता माझी.



## १७. आमची दुपार

लाल रंगाच्या
बारा खांबांचं
निळं सावळं
झाडीत देऊळ
आहे आमच्या वाडीत.



सुट्टीत सारे
चार दोन आम्ही
खात खात गरे
दुपारचे जातो
देऊळ शोधीत.

गार गार फरशा
गुळगुळीत फार
सारे खुशाल
लोळतो आम्ही
दुपारभर देवळात.



खांबावरच्या देवांशी
खेळतो आम्ही खेळ
आंधळी कोशिंबीर
चापट्या चोर
सारी दुपार जाते यात.



मागचा चाफा
पुढचे साग
सावलीत त्यांच्या
विसरतो आम्ही
दुपारची आग !

3525

## १८. बबडीची खेळणी

आई उठ, बाबा उठा
उठा उठा सारे
आता माझ्या खेळण्यांजवळ
बोलू नका बरे.



माझा थोटा हत्ती छान
उंटाच्या पाठीवर ठेवून मान
पडला आहे पहा बरे.

एक डोळा गेलेली
नकटी माझी छकुली
घोरते कशी ऐका सारे.



कोट फाटका शिपाई
तीन माकडांची परेड
घेतो कशी पहा तरी.

अगं आई, लाईट काढ
पांघरूण त्यांना घालू दे
खेळण्याजवळ मला झोपू दे.

आई उठली रागाने
जाऊन झोपली खाली
तिला पाहून बबडी
खुदू खुदू हसली.



## १९. कोण ?

डोंगर दरीत जंगल झाडीत
कोण वाहते खळखळा ?

चांदीच्या दोऱ्या सोडतो खाली
कोण फुलवतो सांगा मळा ?

कातळी काळ्या बांबूचे बन
कोण फुंकितो त्यातून शीळा ?



हिरव्या राईत हिरवा पक्षी
कोणास सांगा कंठ हो निळा ?

सुगंधी सुमांचा सडा अंगणी
कोण पसरे पहाटवेळा ?



पक्ष्यांची गाणी अमृतवाणी
कोण देतो त्यास गोड गळा ?

## २०. होडी

लाटे मागून येता लाट
होडी जाते पुढेच ताठ.

काटा नाही, कुटा नाही
सारी कशी मऊ वाट.
धक्का नाही, धोका नाही
चोहीकडे निळीच वाट.



खड्डा नाही, घाट नाही
गोल, गोल वळणे साठ.
वारा नाही, शिड नाही
ताज मारतो तरया ताठ.

पैंजण पायी, वाजत जायी
चांदीचे चाळ, येता काठ
मऊ मायेची माझी आई
रोज पाहे होडीची वाट.

नाही बाबा, नाही भाऊ
येते चिठ्ठी, मासे आठ
चिडते आई, चिडे ताई
उरतो सारा सुनाच काठ.

## २१. झरा



दिवाळीत आले तेव्हा
झरा झुळूझुळू वाहत होता
काठावरती घेऊन गवत
ठुमकत नाचत जात होता

झाडे शांत उभी होती
होता गात पाखरांचा थवा
फुलली होती लाख फुले
फुलातून झरा वाहत होता

पाय माझे घसरले होते
ओले झऱ्यात झाले होते
भिजून चिंब परकर तेव्हा
उन्हात माझे सुकले होते

पिकल्या पानांचा पाचोळा
झऱ्यात आता करतोय काय ?
झुळझुळणाऱ्या झऱ्याचे
सांग आई झाले काय ?

## २२. असे वाटते



पंख पसरूनी, रंग उधळुनी
झुडुपामधुनी फिरायचे
शंख फुंकुनी, अंग घुसळुनी
लाटामधुनी लोळायचे.



मऊ, मऊ वाळूत
बांधुनी बंगले
चिमणा-चिमणी व्हायाचे
चिवचिव करत
भूरभूर फिरत
इकडून तिकडे उडायचे



सुरूच्या बनात
सावलीच्या कानात
गाणे गात झुलायचे
लाटांचा साज
सागराची गाज
ऐकून सुसाट धावायचे.



माख माखुनी, अंग झाकुनी
झटकत वाळू जायाचे.
घर काठाला, आई एकटी
बिलगून तिजला राहायचे.

BVBK-0403528

## २३. राणी

राणी माझी रानात गेली
काजू बोंडं वेचून आली
काजू अगदी पिवळे लाल
उन्हात भाजले राणीचे गाल



राणी माझी रानात गेली
काटके सारी वेचून आली
काटके होती लांबट गोल
डोक्याला रुतली खूप खोल.



राणी माझी रानात गेली
लांबून पाणी घेऊन आली
पाण्याचा माठ गारेगार
राणी माझी गुणाची फार.



# अंजनी प्रकाशन

प्लॉट नं. ९३, महेश सोसायटी,
गणपती मंदिर मागे, बिबवेवाडी, पुणे ३७.
फोन : ५१८५८३

## अंजनी प्रकाशन, योगेश प्रकाशन व सोनाली प्रकाशन यांची दर्जेदार बाल-कुमार वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| मुलांचा मेवा भाग १ ते २ | पंढरीनाथ रेगे | ४०/- |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | दत्ता जी. कुलकर्णी | १५/- |
| विज्ञान परिचय माला (भाग १ ते ४) | | |
| वाहनांची ओळख | डॉ. भय्यासाहेब ओंकार | ६०/- |
| असे हे जग | सौ. नलिनी दत्तात्रय | ३०/- |
| मुलांचे गोष्टीरूप चाणक्य | श्रीकृष्ण जोशी | २०/- |
| विविध शालेय उपक्रम | डॉ. भय्यासाहेब ओंकार | २०/- |
| परिकथा लोककथा | पंढरीनाथ रेगे | ३०/- |
| सूर्योदय | प्रकाश परसवाळे | १५/- |
| विरंगुळा | म. अ. खाडिलकर | २०/- |
| रंजक गोष्टी | दत्तू गोरे | १०/- |
| ज्ञानविहार | पंढरीनाथ रेगे | २०/- |
| धाडशी विश्वास | एम. के. बेहेरे | २०/- |
| मनी आणि मोत्या | रमेश मुधोळकर | १०/- |
| गाडगे महाराजांच्या गोष्टी | सुबोध मुजुमदार | १०/- |
| जगातील कुतुहल | डॉ. भय्यासाहेब ओंकार | २०/- |
| विज्ञानातील चमत्कार | बाबुराव शाळीग्राम | २०/- |
| आधुनिक संत विनोबा भावे | रमेश मुधोळकर | १०/- |

| | | |
|---|---|---|
| वहाने एक वरदान | डॉ. भय्यासाहेब ओंकार | ३०/- |
| फळभाज्या, पालेभाज्या एक संजीवनी | स्मिता देवधर | २०/- |
| गोटूची करामत | हनुमंत गवळी | २५/- |
| वरदान | हनुमंत गवळी | २०/- |
| पक्ष्यांबद्दल कुतुहल | सौ. स्मिता देवधर | २०/- |
| वृक्ष संजीवनी | सौ. स्मिता देवधर | १५/- |
| वन्यप्राणी जीवन | सुजाता आंग्रे | १५/- |
| चतुर सुगरण | मदन हजेरी | २०/- |
| सहलीत सापडलेला खजिना | श्रीकृष्ण जोशी | २०/- |
| मी नाही बोबल कांदा | पंढरीनाथ रेगे | १०/- |
| सेक्सपिअरच्या नाट्यकथा | रमेश मुधोळकर | २५/- |
| बीजदाता | सूर्यकान्त तावडे | २५/- |
| निवडक बालकथा (भाग १ व २) | दत्तू गोरे | २०/- |
| सुबोधकथा (भाग १ व २) | सौ. नलिनी दत्तात्रय | २०/- |
| रानमेवा | बाबुराव शाळीग्राम | २०/- |
| शेक्सपिअरच्या नाट्यकथा | रमेश मुधोळकर | २५/- |
| बीजदाता | सूर्यकांत तावडे | २५/- |
| परींची शाळा | नितीन फुटाणे | १५/- |
| झिमझिम धारा | मदन हजेरी | १५/- |
| गजरे विकणारी मुलगी | मदन हजेरी | २०/- |
| पळवाट | सौ. स्मिता देवधर | ८०/- |
| हल्लागुल्ला | प्रकाश मोतीराम शिंदे | ३०/- |
| वादळातील सर्कस | सरोजिनी वझे | २०/- |